# मुंबई विद्यापीठ

## प्रसिध्दी पत्रक

मुंबई विद्यापीठाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामधील सन २०१३–१४ या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया ३० मे, २०१३ पासून सुरू करण्यात आली आहे. या वर्षी प्रथमच विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जाबरोबरच ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज भरणे अनिवार्य करण्यात आले आहे. नाव नोंदणी अर्ज भरण्याची अंतिम तारीख दि. ७ जून, २०१३ पर्यंत देण्यात आलेली आहे. या ऑनलाईन प्रक्रियेमध्ये दि. ६ जून, २०१३ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत २ लक्ष ५५ हजार ४२८ अर्ज दाखल झाले असून हे सर्व अर्ज १ लक्ष ३८ हजार ८१८ विद्यार्थ्यांनी भरून पूर्ण केलेले आहेत.

मागील वर्षी एकूण १ लक्ष ६५ हजार २०५ विद्यार्थ्यांची नोंदणी मुंबई विद्यापीठाच्या कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेसाठी प्रथम वर्षासाठी झालेली होती. ही प्रक्रिया प्रथमच मुंबई विद्यापीठामध्ये सुरू झालेली असल्याकारणाने काही ठिकाणी विद्यार्थ्यांना अडचणी आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या तक्रारी दूर करण्याचा विद्यापीठाने प्रयत्न करून त्या दुरूस्त केल्या आहेत. तरी परंतु, प्रथमच ही सेवा सुरू केलेली असल्यामुळे व विद्यार्थ्यांच्या काही तक्रारी असल्यामुळे विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होवू नये या कारणास्तव नाव नोंदणी प्रक्रिया दि. १० जून २०१३ पर्यंत सकाळी १०.०० वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात येणार आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी व सर्व संबंधित महाविद्यालयांनी नाव नोंदणी प्रक्रिया दि. १० जून, २०१३ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत सुरू राहील याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे सर्व्हर देखभालीसाठी ६ जून, २०१३ रोजी रात्री ११.०० वाजल्यापासून ते दि. ७ जून २०१३ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत, दि. ७ जून २०१३ रोजी दुपारी १.०० ते ३.०० वाजेपर्यंत, दि. ८ जून २०१३ रोजी दुपारी १.०० ते ३.०० वाजेपर्यंत, त्याचप्रमाणे दि. ९ जून २०१३ रोजी दुपारी १.०० ते ३.०० वाजेपर्यंत बंद ठेवण्यात येईल, याची कृपया सर्व विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी दि. ९ जून २०१३ रोजी रविवार असल्यामुळे केवळ ऑनलाईन नोंदणी करण्यात येईल, पण प्रवेश मात्र महाविद्यालयांची कार्यालये सुरू असतानाच करण्यात येईल. तसेच ऑनलाईन प्रक्रियेव्यतिरीक्त प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, याची कृपया सर्व विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव